ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भाषेच्या अध्यापनात नाट्यीकरणाची उपयुक्तता

**अदिती अनिल गुजर, त्रिवेणी महादेव माळी** *(Page 38-40)*
*टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे ३०*

**SRJIS IMPACT FACTOR SJIF 2015**: 5.401
**Date of Issue Release:** 04/03/2017,
**Volume**: SRJIS, Jan-Feb, 2017, 4/30

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

साहित्यशास्त्रावरील पहिला उपलब्ध ग्रंथ म्हणजे भारतमुनींचे नाट्यशास्त्र हा होय . याची रचना इसवीसनाच्या दुसऱ्या शतकात पूर्ण झाली . या ग्रंथात नाट्याची उत्पत्ती कशी झाली या बद्दलची आख्यायिका आहे . चार वेदांपासून  नाट्याची निर्मिती झाली असे म्हणले जाते . त्या मध्ये ऋग्वेदापासून पाठ्य म्हणजेच कथावस्तू किंवा संवाद यजुर्वेदापासून अभिनय सामवेदापासून गीत व संगीत व अथर्ववेदापासून रस असे एकत्रित मिळून चार वेद पासून नाट्याची  निर्मिती झालेली दिसून येते . तर हे नाट्य प्रकार प्राचीन काळापासून चालत आलेले आहेत जे आजतागायत सुरु आहेत .यामधून मनोरंजन हि एकाच गोष्ट लोकांना माहित आहे. परंतु या  नाट्या चा उपयोग शैक्षणिक क्षेत्रात अधयापनात देखील उपयुक्त ठरते.

सर्वसाधारणपणे शैक्षणिक वर्षामध्ये एकदा वार्षिक स्नेहसंमेलन होते त्या मध्ये आपण नाटके ,एकांकिका बसवतो .पुण्यासारख्या शहरामध्ये अनेक शाळांमध्ये नाटके ,एकांकिकाच्या स्पर्धा असतात . परंतु क्वचित वर्गामध्ये पाठावर  आधारित नाट्य बसविले जाते .म्हणजेच शैक्षणिक कार्यात नाट्याचा  खूप कमी उपयोग केला जातो.

नाट्यीकरणाचा एक अध्यापन पद्धती म्हणून अजूनही स्वीकार झाल्याचा दिसून येत नाही .जो अध्यापन पद्धतीत झाला पाहिजे . अभ्यासक्रमातील काही उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी नाट्यीकरणाची अध्ययन पद्धती अत्यंत उपयुक्त आहे.

**नाट्यीकरणाची उद्दीष्टे :**

१ विद्यार्थ्यांची भाषा सुधारणे .

२ विद्यार्थ्यांना जीवनानुभव देणे.

३ विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा विकास करणे.

४ विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधणे .

५ शारीरभाषेचा उपयोग करण्यास शिकविणे.

**भाषिक अध्यापनात नाट्यीकरणाची प्रक्रिया:**

भाषेच्या अध्यापनात नाट्यीकरणाचा उपयोग करताना शिक्षकाने काळजीपूर्वक नियोजन करणे आवश्यक आहे.

१. शैक्षणिक उद्दिष्टे निश्चित करणे

२. योग्य नात्यांशी व संहिता निवडणे.

३. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

४. प्रत्यक्ष नाट्याचे सादरीकरण करणे

५. चर्चा व मूल्यमापन करणे

**सारांश:**

या तंत्राचा उपयोग करून अध्यापन प्रभावी होते. निश्चित शैक्षणिक उद्दिष्टे साध्य होतात. अध्यापनात नाट्यीकरणामुळे विद्यार्थ्यांचे आकलन वाढते. तसेच यामुळे विद्यार्थ्यांची कल्पकता, सृजनशीलता, अभिनय क्षमता आणि सादरीकरणाचे धैर्य वृद्धिंगत होते. भाषिक कौशल्य विकसित होते. आशयाचा गाभा समजतो. मूल्यांची रुजवणूक होते. विद्यार्थ्यांची आस्वाद क्षमता वाढते. एकंदर, व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होतो.

**संदर्भ:**

*साधना पेंडके, संस्कृत अध्यापन, मंगेश प्रकाशन, नागपूर*
*अरविंद दुनाखे, मराठी आशययुक्त अध्यापन, नित्यनूतन प्रकाशन, पुणे*